आनंदाचे क्षण छोटेसे असतात, पण त्यांची आठवण मोठी असते.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

dainiklokaarambh@gmail.com

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शनिवार २१ जून २०२५ | अंक १८४ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# कम ऑन किल मी: उद्धव ठाकरेंच्या चॅलेंजवर एकनाथ शिंदे यांचं खणखणीत उत्तर

आज शिवसेनेच्या 59 व्या वर्धापन दिनानिमित्त दोन मेळावे पार पडले. शिवसेना ठाकरे गटाचा वर्धापन दिनाचा सोहळा षण्मुखानंद हॉलमध्ये पार पडला. यावेळी उद्धव ठाकरेंनी कम ऑन किल मी असा एल्गार केला. त्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील वर्धापन दिनाच्या सोहळ्यादरम्यान केलेल्या भाषणावेळी जोरदार प्रत्युत्तर दिले.उद्धव ठाकरे काय म्हणाले?उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात ९२-९३ च्या मुंबईतील दंग्यांची आठवण करून दिली. “९२-९३ साली जेव्हा दंगा भडकला होता, तेव्हा तुम्हीच रस्त्यावर उतरला होता. तेव्हा एक व्यक्ती बाळासाहेबांकडे आली होती. बाळासाहेब आता




बस्स झालं. पुरे झालं. ती व्यक्ती कोण सांगणार नाही. ते हयात आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यानंतर उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. यावेळी उद्धव ठाकरेंनी नाना पाटेकर यांच्या ‘प्रहार’ चित्रपटाचा संदर्भ दिला. “मी पिक्चर पाहिला. प्रहार पाहिला. नाना पाटेकर यांचा. त्यात नाना पाटेकर गुंडासमोर उभा राहतो आणि सांगतो ‘कम ऑन किल मी’. तसा मी या गद्दारांसमोर उभा आहे. म्हणतोय ‘कम ऑन किल मी’. असेल हिंमत तर या अंगावर. फक्त अंगावर येणार असाल तर एक गोष्ट नक्की करा. अमिताभचा पिक्चर होता ना ॲम्ब्युलन्स घेऊन येतो. तसं येत असाल तर ॲम्ब्युलन्स घेऊन यायची. येताना सरळ याल. जाताना आडवे होऊन जाल.” असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. एकनाथ शिंदेंचे जोरदार प्रत्युत्तर उद्धव ठाकरे यांच्या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. “इंग्रजी चित्रपट पाहून आले असतील. लंडनला सुट्टीसाठी गेले होते, असे एकनाथ शिंदे मिश्किलपणे म्हटले. “‘मरे हुए को क्या मारना है’, महाराष्ट्राच्या जनतेने विधानसभेत तुमचा मुडदा पाडलेला आहे. नुसता करून नाही शोर, मनगटात येत नाही जोर हे लक्षात ठेवा. वाघाचं कातडं पांघरून लांडगा वाघ होत नाही. त्याला शेर कलेजा लगता है आणि मनगटात जोर लागतो.

## नारायण गडावर दर्शनाला जाणाऱ्या भावीकांना लुटमार करत केला जबर हल्ला. अद्याप पोलिसांनी जाब घेतला नसल्याने गुन्हा दाखल झाला नाही.

बीड (प्रतिनिधी) दि २० गुंत्तेगाव येथुन बीड मार्गे नारायण गडावर दर्शनासाठी शिवाजी मच्छींद्र भिसे (३५ वर्षे), मच्छींद्र शाहू भिसे (६२ वर्षे) आणि कविता लक्ष्मण राहिंजे (३३वर्षे) तिघे बाप लेक जात असतांना बेलुरा वेस जवळील गबारीजवळ आडवुन जेष्ठासह जबर मारहाण करत, महिलेचा विनयभंग करुन मोबाईल, पॅशन प्रो (एमएच. २३ एए ९१२८), सोन्याची पोत असा ऐवज लुटला. सविस्तर वृत्त असे की गुंत्तेगाव ता. गेवराई जि. बीड येथील शिवाजी भिसे, मच्छींद्र भिसे, कवीता भिसे हे नारायण गडावर दर्शनासाठी बीड मार्गे जात असतांना बेलुरा वेस जवळील गबार येथे किसन जानू राहिंज, रमेश किसन राहिंज, धनु बळीराम राहिंज, लक्ष्मण



किसन राहिंज, बाळु पारखे, अभिमान कसपाटे, दत्ता डफफाळ, नन्या गावडे, विलास भावले,दादा सोलाट, स्वाती वीर, भाग्यश्री राहिंज, ज्योती राहिंज, कांताबाई राहिंज, पुजा राहिंज, ऋतुजा राहिंज, शांताबाई गावडे यांनी रोडवर मोटारसायकल आडवुन मोबाईल, सोन्याची पोत व मोटारसायकल हिसकावुन घेतली तसेच किसन राहिंज, धनु राहिंज, बाळु पारखे यांनी शिवाजी भिसे यांना पकडले व रमेश राहिंज याने तुला जिवच मारतो असे म्हणत लोखंडी हत्याराने डोक्यात जबर हल्ला केला त्याचवेळी कविता राहिंज यांनी शिवाजी भिसे यांना वाचविण्यासाठी प्रयत्न केला असता ज्योती राहिंज, भाग्यश्री राहिंज, कांताबाई राहिंज यांनी पकडले व रमेश राहिंज यांने भर रस्त्यावर साडी

फेडली व छातीवर बुक्याने मुका मार दिला व मानेवर आणि तोंडावर नखाने ओरबाडून जखमी केले तसेच मच्छींद्र भिसे या वयोवृद्धास देखील लक्ष्मण राहिंज, अभिमान कसपाटे यांनी जोराचा धक्का दिल्याने डाव्या पायाच्या गुडघ्याला मुका मार लागला आहे. सदरील घटणा हि दि. २० रोजी दुपारी २ च्या दरम्यान झाली मात्र गाडी हिसकावुन घेतल्याने उपचारासाठी रुग्णालयात लवकर जाता आले नाही तर मोबाईल हिसकावुन घेतल्यामुळे कोणाशी संपर्क करता आला नाही, याच दरम्यान नवगन राजुरी येथील काही लोक आले त्यांनी अँबुलन्सला कॉल करुन जिल्हा रुग्णालयात दाखल केल्यामुळे शिवाजी भिसे यांचा जिव वाचला जखमी तिघेही बीड जिल्हा रुग्णालयात वार्ड क्र. ५ मध्ये उपचार घेत असून अद्याप पर्यंत पोलिसांनी जाब घेतला नाही.

## केरूळ येथे कृषी कन्यांचे आगमन

आष्टी । प्रतिनिधी आष्टी तालुक्यातील केरुळ येथे श्री. छत्रपती शाहू, फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थींनी कृषीकन्यांचे केरुळ या गावात आगमन झाले आहे. यावेळी कृषीकन्या वैष्णवी काकडे पाटील, सृष्टी धट पाटील, मयुरी ढोबळे पाटील, वैष्णवी डाळिंबकर पाटील, साक्षी आळेकर, चिलका उर्मिला साई, शिरिषा नुणावत, तेजस्विनी याडापल्ली, देवयानी धोंडे यांचे केरुळ गावातील गावकऱ्यांनी व शेतकरी बांधवांनी स्वागत केले कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. आरसुळ , कृषी कार्यानुभव कार्यक्रम समन्वयक प्रा. आय. एम. तांबोळी, कार्यक्रम अधिकारी प्रा. सीमा शिंदे (मृदा शास्त्र व कृषी रसायन शास्त्र ) यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीकन्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम २०२५ -२६ अंतर्गत शेतकऱ्यांना याबाबत सविस्तर माहिती दिली ह्या कृषीकन्यां २ महिने शेतकऱ्यांना शेती विषयी मार्गदर्शन करणार आहेत यावेळी गावच्या माननीय सरपंच सौ.मनिषा सपुत्रे आणि सुनील सूर्यवंशी ,संकेत अनारसे, मधुकर अनारसे, शेख अन्सार, शिवाजी तावरे, पोपट अनारसे, संतोष गोंदकर, शेख हबीब, प्रज्वल मोहोळकर , नंदू सूर्यवंशी, अनिल सूर्यवंशी, बंडू महाजन,नामदेव तावरे तसेच इतर शेतकरी बांधव उपस्थित होते.

## आ.संदीप क्षीरसागराकडून विविध कामांची पाहणी



बीड । प्रतिनिधी शहरातील नागरी प्रश्न आणि कामे मार्गी लागावेत यासाठी आ.संदीप क्षीरसागर, शहरातील विविध भागांमध्ये दररोज जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत. यासोबतच सुरू असलेल्या कामांकडे लक्ष ठेवून आहेत. गुरूवारी (दि.१९) रोजी आ.क्षीरसागर यांनी शहरात सुरू असलेल्या विविध कामांच्या ठिकाणी भेटी देऊन संबंधितांना सुचना दिल्या.

## बीड शहर बचाव मंच कडून महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी..

बीड (प्रतिनिधी) - शहरातील मोमीनपुरा भागात असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तानची पाहणी बीड शहर बचाव मंच ने शुक्रवार दिनांक २० जून रोजी केली. कब्रस्तानची झालेली दुर्दशा पाहून मंच चे पदाधिकारी आणि सदस्यांनी संवेदनशीतलता व्यक्त करत कब्रस्तानच्या संरक्षक भिंती बांधण्यासाठी तसेच कब्रस्तान मध्ये आवश्यक असलेल्या इतर सोयी सुविधा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करून लवकरात लवकर पूर्णत्वास नेऊ असे म्हटले आहे. यावेळी बीड शहर बचाव मंच च्या वतीने नितीन जायभाये, डी.जी. तांदळे सर व नितीन वाघमारे यांनी



भूमिका स्पष्ट केली. गेल्या दहा वर्षांपासून बऱ्याच वेळेस लोकप्रतिनिधींना पाठपुरावा करूनही लोकप्रतिनिधीं दिलेले आश्वासन पाळत नाहीत, समाजाच्या अडचणी समजून घेण्याची कसलीही त्यांची मानसिकता दिसत नाही. कशाही - कसल्याही प्रकारे प्रतिसाद देत नाहीत, निवडणुकांनंतर तोंड ही दाखवत नाहीत. काम करणं दुरच राहीलं, साधा फोन ही उचलत नाहीत. अशी यावेळी उपस्थितांच्या वतीने प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. कब्रस्तानची पाहणी केल्यानंतर व ऐतिहासिकता जाणून घेतल्यानंतर नितीन जायभाये यांनी या कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीचे पुनर्निर्माण करण्यात येईल,असे ठामपणे आश्वासन दिले आहे. बीड नगर पालिकेची नवीन असेंबली किंवा सभागृह अस्तित्वात येताच तात्काळ ही कामे करून दिल्या जातील. तसेच महेदवीया कब्रस्तानच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधा निर्माण करून दिल्या जातील. असेही वचन दिले आहे. यावेळी महेदवीया समाजाचे प्रतिनिधी तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी महेदवीया दायरा कब्रस्तान विषयी पुर्ण माहिती दिली. यावेळी बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, ज्येष्ठ मार्गदर्शक सेवानिवृत्त प्राचार्य डी.जी. तांदळेसर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, रमेशराव गंगाधरे,ॲड. नितीन वाघमारे, रामधन जमाले, सुधीरभाऊ देशमुख,पेठ बीड विभागातील भुषणजी पवार, आपतक यूट्यूब चॅनल चे संपादक इमरोज भाई, शेख फारुख, शेख वसीफ, शेख नसीर, शेख हनीफ, शेख लईख आदींची उपस्थिती होती.

## मा. श्री. पालकमंत्री साहेब.शहरातील तेलगाव नाका वरील रस्त्याचे अर्धवट काम कधी पूर्ण होणार ? :- शेख युनूस



बीड (प्रतिनिधी) शहरातील मेन भाग असलेले तेलगाव नाका वरील रस्त्याचे काम एक महिन्यापासून अर्धवट सोडलेले आहे त्यामुळे रहदारीत अडचण निर्माण होत आहे. तसेच नेहमी ट्राफिक जाम होत आहे, आणि अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकाला प्रश्न पडलेला आहे की राहिलेले काम पूर्ण कधी होतील, दादा तुम्ही म बीडला महिन्यात कमीत कमी दोन-तीन दिवस राहून शहराची पाहणी करत जा,असे नागरिकाचे मत आहे तेव्हाच तुम्हाला कळेल की बीडची अवस्था काय आहे. तुम्ही एक दोन घंटे येतात अधिकाऱ्यांशी व जवळच्या कार्यकर्त्यांशी भेटून जातात तुम्ही गेले की परिस्थिती जैसे थी वैसे होऊन जाते. तुम्ही यायचे झाले की रस्ते साफ ,खड्डे बुजवणे ,शहरातील नाल्या साफसफाई सुरू अशी परिस्थिती निर्माण होत आहे. सध्या बीड शहरात नळाला दूषित पाणी येत आहे ते पण दहा ते बारा दिवसाला सर्व तलाव तुंबून भरलेले तरीपण म्हणायची वेळ येत आहे ङ्गधरण उशाला आणि कोरड घशालाङ्गसंबंधित अधिकाऱ्यांशी विचारले असता पावसाच्या पाण्यामुळे पाणी घाण येत आहे असे बोलले जात आहे. याकडे पाणीपुरवठा अधिकारी कर्मचारी मुख्याधिकारी लक्ष देत नाही. दादा आपण बीडचे पालकमंत्री पद स्वतः हून स्वीकारले आहे त्यामुळे बीडच्या जनतेला आपल्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत माझी वर्तमानपत्रातून आपल्याला विनंती आहे की ,आपण संबंधित अधिकारी, गुत्तेदार यांना धारेवर धरावे व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

## नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर

### स्व.केशरकाकूंचा शैक्षणिक वारसा नव्या पिढीकडे उच्चशिक्षित नेतृत्वाकडे शैक्षणिक संस्थेची धुरा

बीड (प्रतिनिधी)दि.२० : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या बीड येथील नवगण शिक्षण संस्था आणि विनायक युवक कल्याण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांची निवड गुरुवारी (दि.१९) करण्यात आली आहे. त्यांच्या रुपाने उच्चशिक्षित व्यक्तिमत्वाकडे शिक्षण संस्थांची धुरा सोपविण्यात आली असून त्यांचे निवडीबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे. बीडमध्ये नवगण शिक्षण संस्थेची स्थापना १९६३ साली लोकनेत्या व माजी खासदार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर यांनी केली. त्याकाळी जिल्ह्यातील ग्रामीण व डोंगराळ भागात शिक्षणाच्या सुविधा अत्यंत अपुऱ्या होत्या. ही गरज ओळखून काकूंनी शेतकरी, ऊसतोड कामगार, गरीब व वंचित मुला -मुलींसाठी विविध शाळा व महाविद्यालयांची स्थापना करून शिक्षणाचा दिवा ग्रामीण भागात तेवत ठेवला. त्यांच्या प्रयत्नांमुळे संस्थेने लावलेले शैक्षणिक रोपटे आज वटवृक्ष बनले आहे. पहिल्यांदा संस्थेच्या सचिवपदी ३१ डिसेंबर १९६५ रोजी भागुजीराव सनगर, १९६८ मध्ये केशरकाकू क्षीरसागर, १९७७ मध्ये सोनाजीराव क्षीरसागर, १९८७ मध्ये भारतभूषण क्षीरसागर यांची नियुक्ती झाली. त्यानंतर आता सन २०२५ मध्ये सचिवपदी डॉ.योगेश क्षीरसागर यांची निवड झाली. सध्या नवगण शिक्षण संस्थेअंतर्गत बीड जिल्ह्यातील विविध भागात ५ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, सैनिक विद्यालय, आश्रमशाळा, उर्दू शाळा प्रत्येकी १, ६ उच्च माध्यमिक शाळा, १० माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, व्यवसाय अभ्यासक्रम केंद्रे प्रत्येकी २ अशा विविध प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये एकूण सुमारे



नवगण, विनायक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शहर, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा संस्थेचा मूलमंत्र राहिला आहे. या परंपरेत सातत्य राखून संस्थेचा विस्तार व शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी कटिबद्ध राहू. अधिकाधिक शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपूर्ण व्यावसायिक अभ्यासक्रम आणण्यासाठी प्रयत्न करू. तसेच, संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सामाजिक उपक्रम राबविले जातील.
**-डॉ.योगेश क्षीरसागर, नवनिर्वाचित सचिव, नवगण व आदर्श शिक्षण संस्था, बीड.**

६०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच, याशिवाय १९८४ साली स्थापन झालेल्या विनायक युवक कल्याण संस्थेमार्फत ३ माध्यमिक शाळा, २ प्राथमिक शाळा चालविल्या जातात. येथे सुमारे ५० कर्मचारी कार्यरत असून दरवर्षी अंदाजे १००० विद्यार्थी शिक्षण घेतात. याआधी संस्थेचे सचिवपद डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी समर्थपणे सांभाळले. दरम्यान, आता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या रूपाने मिळालेले नव्या दमाचे नेतृत्व, आधुनिक शिक्षणदृष्टी यामुळे संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीत अधिक सकारात्मक परिवर्तन होईल, अशी अपेक्षा व्यक्ती केली जात आहे. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २१ जून २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## नका सांगू कोणाला, चांगले वाग म्हणून...

इयत्ता पहिली ते तिसरीपर्यंत हिंदी भाषा ङ्गअनिवार्यफ नसेल, मात्र तिस-या भाषेच्या रूपात ती शिकवली जाणार आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने नवा शासकीय निर्णय जारी केला आहे. त्यामुळे तिसरी भाषा हिंदीच राहणार असून, राज्य सरकारच्या या नव्या ङ्गजीआरफबद्दल मराठी भाषातज्ज्ञांनी संताप व्यक्त केला आहे. हिंदीऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, ती भाषा त्यांना शिकवण्यात येणार आहे. मात्र, ती तिसरी भाषा शिकवणारा शिक्षक त्या शाळेत नसेल तर सदर भाषा ही ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही अनिवार्य असेल, असेही शालेय शिक्षण विभागाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शालेय आराखड्याद्वारे तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा विषय अनिवार्य असेल, असे नमूद करण्यात आले होते. परंतु राज्य सरकारच्या या निर्णयावर राज्यभरातील शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात प्रचंड टीका झाली. त्यानंतर सरकारने एक पाऊल मागे घेत हिंदी भाषा ही अनिवार्य नसेल, असे स्पष्ट केले होते. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीच याबाबतची घोषणा केली होती, परंतु आता तोच निर्णय फिरवून नव्या शब्दांत जारी केल्याने शिक्षण क्षेत्रात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. हा आदेश काढून शासनाने अप्रत्यक्षरीत्या हिंदी भाषा मुलांना शिकण्याची व शाळांना शिकवण्याची सक्ती केली आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा संदर्भ दिला असला तरी हा आदेश नवीन शैक्षणिक धोरणाच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्याच्या कृतीला हरताळ फासणारा आहे. राज्य सरकारच्या नव्या ङ्गजीआरफमध्ये केवळ ङ्गअनिवार्यफशब्द वगळला असून, २० पटसंख्या असल्यास इतर भाषा शिकता येईल असे नमूद केले आहे. मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी तृतीय भाषा असल्याचा उल्लेख शासन निर्णयात आहे. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा असेल तर त्यांना ती भाषा निवडता येणार आहे. मात्र, शाळेत त्या तृतीय भाषेचा पर्याय घेताना किमान २० विद्यार्थी एवढी पटसंख्या असावी, असे शासन निर्णयात नमूद आहे. सद्यस्थितीत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार तिसरी भाषा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देवनागरी लिपीमुळे व संवाद साधत असताना मोठ्या प्रमाणात हिंदी भाषेचा वापर केला जातो. त्यामुळे विद्यार्थी मागणी करतील त्याप्रमाणे त्यांना तिसरी भाषा शिकवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. पण हे करत असताना कोणत्याही वर्गातील एकूण पटसंख्येपैकी २० विद्यार्थ्यांनी एखाद्या भाषेची मागणी केली तर त्यांना त्यांच्या पसंतीची भाषा शिकवली जाईल असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे. हिंदी लादण्याचा ठरवून कट केल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. ते म्हणाले, देवेंद्र फडणवीसांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या आणि माय मराठीच्या छातीत सुरा भोसकून घात केला, तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती केली, जनतेची फसवणूक केली गेली. पर्यायाचा देखावा आणि हिंदी लादण्याचा हा ठरवलेला कट आहे. हा भाजपचा महाराष्ट्रद्रोही अजेंडाच असून हे मराठी भाषा, मराठी अस्मिता आणि मराठी माणूस यांना संपवण्याचे कारस्थान आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सरकारने हिंदी शिकवून दाखवावीच असे आव्हान दिले आहे. आपण हिंदू आहोत हिंदी नाही. मराठी भाषेची सक्ती दक्षिण भारतातील राज्यात कराल का? आज भाषासक्ती करत आहात, उद्या इतर सक्ती होऊ शकते. या निर्णयामागे आयएएस लॉबी असण्याची शंका आहे. गुजरातमध्ये हिंदी सक्तीची का नाही? मग महाराष्ट्रावर का लादत आहात? केंद्रात नरेंद्र मोदी, अमित शहा असताना गुजरातमध्ये हिंदी सक्तीची का नाही? राज्य सरकार शाळांमध्ये विषय कसे शिकवतात, ते आम्ही पाहू. महाराष्ट्रामध्ये हिंदीची सक्ती कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही, असा इशारा मनसेप्रमुखांनी दिला आहे. हिंदी भाषेच्या सक्तीवरून सुरू असलेल्या वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, नवीन जीआरमध्ये ङ्गअनिवार्यफहा शब्द काढून टाकण्यात आला आहे. यामुळे हिंदीसक्तीची भीती दूर झाली असून, आता कोणतीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येणार आहे.

# जिल्हाभरात दि. २१ जून रोजी योग दिन नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

बीड, दि. २० (:- जिल्हयात दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा क्रीडा संकुल, जालना रोड, बीड येथे सकाळी ६.३० वाजता या कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, योग साधक, विद्यार्थी, युवक युवती, नागरीक आदींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.तालुकास्तरावरून देखील मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येणार आहे. सदर नियोजनासाठी प्रशासनाबरोबरच पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, योगा संघटना आणि विविध सामाजिक संस्था सहभागी होणार आहेत.संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केलेला आहे. पाच हजार वर्षांपासून अधिक परंपरा असणारी योग विद्या ही भारताने जगाला दिलेली देगणी असून व्यक्तीच्या शारिरीक आणि आत्मिक विकासासाठी योग विद्या सहाय्यभूत ठरते. जागतिक योग दिनाचे आयोजन करताना देशभर व जगातील विविध देशात देखील याचे कायक्रम केले जातात. यामध्ये सकाळी ६.३० ते ८.०० या कालावधीत सामूहीक योगाची प्रात्यक्षिके करणे आणि त्याबाबत जनजागृती घडवून सर्वसामान्य व्यक्तीस याचे महत्त्व पटवून देणे, यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो. यामुळे जिल्हयामध्ये देखील योग दिनानिमित्त समाजातील सर्व स्तरावरील महिला, पुरुष, युवक-युवतींनी यामध्ये सहभाग घ्यावा.

योग दिनाच्या पुर्वतयारी बाबत बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी बैठकीस अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, माध्यमिक शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, उपशिक्षणाधिकारी एन.जी. हजारे, ए. बी. खेडकर, जिल्हा आयुष अधिकारी आनंद लिमकर, पतजंली योगपीठाचे जिल्हा प्रमुख ॲड. श्रीराम लाखे, जिल्हा योगा असोसिएशनचे सचिव विनायक वझे, क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य पुरस्कारार्थी प्रा. जे.पी. शेळके, डॉ. अविनाश बारगजे, योगगुरू विकास गवते, भागवत वाघ, मयुरेश गावस्कर, क्रीडा अधिकारी अनकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिश राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक आदी उपस्थित होते. तालुक्याच्या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करताना तहसिलदार नोडल अधिकारी म्हणून, गटविकास अधिकारी हे सह नोडल अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी हे सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.ग्रामीण भागातील तालुक्याचे ठिकाण आणि बीड शहराचे ठिकाण वगळता इतर गावांमधील शालेय विद्यार्थी व नागरिकांसाठी त्या त्या गावामध्ये तसेच शाळा, विद्यालये, महाविद्यालये या ठिकाणी योग दिनाचे आयोजन करावे बाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे.

*****

# शिवशक्ती प्रतिष्ठान पालवण आयोजित सामाजिक उपक्रम

चांगल्या उद्देशाने केलेले चांगलं काम कधीही दिसून येते.. जवळपास ८० + विद्यार्थ्यांना शिवशक्ती प्रतिष्ठान कडून आतापर्यंत स्कूल बॅग शालेय साहित्य देण्यात आले आहेत.. आज पालवण येथे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा वाचल्या पाहिजेत या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप करण्यात आले गाव असो की शहर उद्देश शिक्षणातील मदतीचा अनब शिक्षणाच्या वाढत्या सहभागाचा आहे.. आता शिकले तर भविष्यात स्पर्धेत टिकले.. हे महत्वाच आहे.. शिवशक्ती प्रतिष्ठान पालवण अशीच चांगली कामे उभे करेल..



# अखेर कामखेड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नविन सुसज्ज ईमारत बांधकाम पुर्ण ; निजामकालीन मोडकळीस आलेल्या शाळेच्या भिंतीचा कोपरा ढासळुन विद्यार्थ्यांचा हात फ्रॅक्चर झाला होता ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश:- डॉ.गणेश ढवळे



### मोडकळीस आलेल्या निजामकालीन ईमारतीच्या ठिकाणी नविन वर्गखोल्यांचे बांधकाम प्रगतीपथावर :- सुरेश बाहेगव्हाणकर, कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांच्या ठिकाणी नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करणे व इमारत विरहित शाळांना वर्गखोली उपलब्ध करून देणे.याबाबत प्रशासनाने शासन स्तरावरून पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घेऊन ब-याच ठिकाणी वर्गखोल्यांची बांधकामे पुर्णत्वास आलेली आहेत.कामखेडा येथील निजामकालीन ईमारत पाडुन त्याठिकाणी राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत नविन टुमदार ४ वर्गखोल्यांची रूपये ३६ लाख ८० हजार रूपयांच्या ईमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले असुन विद्यार्थी आनंदाने भितीविरहीत शिक्षण घेत असल्याची प्रतिक्रिया कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दिली.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**मो.नं.८१८०९२७५७२**

बीड:- बीड तालुक्यातील कामखेड येथील निजामकालीन केंद्रीय प्राथमिक शाळा मोडकळीस आल्याने दि.१३ जुलै २०२२ रोजी इयत्ता ४ थी मधील कुंदन विजय ओव्हाळ या विद्यार्थ्यांच्या हातावर मोडकळीस आलेल्या शाळेच्या भिंतीचा कोपरा ढासळुन हात फ्रॅक्चर झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व सहका-यांनी शाळेला भेट देऊन ङ्ग्ज्ञानमंदिरांना निधी देण्यात यावा यासाठी वारंवार आंदोलने केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड शशिकांत कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद बीड सुरेश बाहेगव्हाणकर यांनी दखल घेत प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन नविन ४ खोल्यांच्या इमारतीसाठी ३६ लाख ८० हजार रूपयांचा निधी मंजूर केला होता. ३ वर्षांनंतर शाळा इमारतीचे काम पूर्ण झाले असुन आता यावर्षीपासून नविन ईमारतीत विद्यार्थी ज्ञानार्जन करत असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते,प्रसारमाध्यमे, ग्रामस्थांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने निधी देऊन सोडवला असुन याबद्दल समाधान व्यक्त करत अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे डॉ . गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे. सविस्तर माहितीस्तव बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २४७४ शाळा असून यात २४१५ शाळा प्राथमिक तर ५९ शाळा माध्यमिक आहेत. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ३४९ शाळांच्या ५९२ खोल्या धोकादायक असून पावसाळ्यात मोठा पाऊस अथवा वादळवारा आल्यास धोका निर्माण होऊ शकतो. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीची दुरावस्था असून कुठे भिंती कुजलेल्या अवस्थेत, तर कुठे छत पडलेले तर कुठे दरवाजे खिडक्या मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून शाळावर्ग खोल्यांची दुरुस्ती आवश्यक असताना लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असल्याने तसेच वेळेवर उपलब्ध निधी उपलब्ध न झाल्याने शालेय मुलांचे अडचण होत असून दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे त्यामुळे तातडीने धोकादायक शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यात येऊन तात्काळ दुरुस्त करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनासाठी सुसज्ज शाळा सामाजिक कार्यकर्ते, ग्राम स्थांच्या पाठपुराव्यामुळे शिक्षण विभागाने उपलब्ध करून दिली:- चव्हाण एस.एम. ( शिक्षिका, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कामखेडा) जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी पटसंख्या असलेली निजामकालीन शाळा मोडकळीस आली होती.२०२२ मध्ये शाळेच्या भिंतींचा कोपरा ढासळुन विद्यार्थी जखमी झाला होता.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, सरपंच, ग्रामस्थांनी पाठपुरावा केल्यानंतर शाळेला निधी मिळाला आणि सुसज्ज अशी इमारत बांधण्यात आली असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न मिटला असल्याचे सहशिक्षिका चव्हाण एम.एस. यांनी सांगितले. जुनी शाळा अंगावर पडती का काय अशी भिती वाटायची :- आरजु शेख ( विद्यार्थीनी) सन २०२२ मध्ये कुंदन ओव्हाळ विद्यार्थ्यांच्या अंगावर भिंतींचा कोपरा कोसळुन जखमी झालेल्या विद्यार्थ्यांची आठवण सांगताना जुन्या शाळेत वर्गात बसायला भिती वाटायची शाळा अंगावर पडती की काय? आता शाळा नविन झाली त्यामुळे आम्हाला आनंद वाटतो अशी प्रतिक्रिया आरजु शेख विद्यार्थीनीने डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना दिली.

# नगदनारायण गड दिंडीचे बुधवारी पंढरीकडे प्रस्थान

## पायी दिंडी सोहळ्यात उपस्थित राहण्याचे महंत शिवाजी बाबा, विश्वस्त बळीराम यांचे आव्हान

बीड/प्रतिनिधी: दरवर्षी प्रमाणे यावर्षी आषाढीवारीनिमीत्त श्री.क्षेत्र संस्थान नारायणगड ते श्री.क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले असून दि.२५ जून रोजी दिंडीचे प्रस्थान होणार आहे. या दिंडी सोहळ्यात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे अवाहन महंत शिवाजी महाराज, विश्वस्त बळीराम गवते यांनी केले आहे

मागील अनेक वर्षांपासून श्री.क्षेत्र नगद नारायण गड ते श्री.क्षेत्र पंढरपूर अशी पायी दिंडी निघते. हा दिंडी सोहळा जवळपास दहा दिवस सुरू असतो. दि.२५ जून रोजी दिंडीचे प्रस्थान होत असून पहिला मुक्काम बेलूरा येथे होत असून ग्रामस्थांच्यावतीने भाविकांच्या सेवेची तयारी सुरू आहे.दि.२६ जून रोजी दुसरा मुक्काम पाटोदा बे., दि.२७ जून पाचेगाव, दि.२८ रोजी ईट, दि.२९ जून गणेगाव, दि.३० जून वाबची, मंगळवार १ जुलै लहूगाव, बुधवार दि.२ जुलै कुर्डुवाडी, गुरूवार दि.३ जुलै मोडलिंब, दि.४ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहचणार आहे. नारायण गड संस्थानच्या वतीने दिंडींचे नियोजन सुरू असून गडावर दिंडी तयारीची धामधूम सुरू आहे.



नारायण गड दिंडीला अनेक वर्षांची परंपरा असून भाविक दिंडीत परत चालत येत असतात. परतीच्या मार्गातही विविध गावचे नागरीक



भाविकांची मोठी सोय करत असतात. यावर्षी दि.२५ जून रोजी दिंडीचे प्रस्थान होत असून या दिंडी सोहळ्यात नारायण गडच्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे अवाहन गडाचे महंत शिवाजी बाबा, विश्वस्त बळीराम गवते यांनी केले आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २१ जून २०२५
https://lokaarambh.com




# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रतिनिधी | नवी दिल्ली भारताच्या १५ व्या आणि पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती असलेल्या मा. श्रीमती द्रौपदी मुर्मू यांचा वाढदिवस आज देशभरात साजरा होत आहे. त्या आज २० जून २०२५ रोजी ६७ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. या विशेष दिनानिमित्ताने देशभरातून विविध स्तरांतील नागरिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. मा. मुर्मू यांचा जीवनप्रवास म्हणजे संघर्ष, सेवा व साधनेचे प्रतीक आहे. त्यांनी उडीसा राज्यातील छोट्याशा आदिवासी भागातून शिक्षिका म्हणून आपल्या कार्याची सुरुवात केली. त्यानंतर भाजप पक्षाच्या माध्यमातून विधानसभेपासून ते झारखंडच्या राज्यपालपदापर्यंत त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. २१ जुलै २०२२ रोजी त्या भारताच्या राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्या. या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या आदिवासी महिला तसेच दुसऱ्या महिला राष्ट्रपती आहेत. आज राष्ट्रपती भवनात त्यांचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. त्यांनी देशवासीयांचे आभार मानून एकात्मता, संविधान निष्ठा आणि सामाजिक न्याय यावर आधारित संदेश दिला.

# मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदी माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांची नियुक्ती

## अभिषेक घोसाळकर यांच्या निधनानंतर रिक्त जागेवर झालेली नियुक्ती



प्रतिनिधी | मुंबई | दि. २० जून २०२५ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळात एक महत्त्वाची भर पडली असून, माजी नगरसेविका तेजस्वी घोसाळकर यांची संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती अभिषेक घोसाळकर यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर करण्यात आली असून, ती ठाकरे गटासाठी महत्त्वाची मानली जात आहे. राजकीय वारसा आणि सामाजिक सक्रियता तेजस्वी घोसाळकर या ठाकरे सेनेच्या माजी नगरसेविका असून, त्यांनी आपल्या कार्यकाळात प्रभागात विविध विकासकामे केली आहेत. सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या तेजस्वी घोसाळकर यांची नियुक्ती म्हणजे राजकीय वारशाचा आणि लोकसेवेच्या अनुभवाचा योग्य सन्मान असल्याचे म्हटले जात आहे. त्यांचे पती अभिषेक घोसाळकर हे २०१२ ते २०१७ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक होते. त्याच काळात त्यांनी मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदावरही यशस्वी कारकीर्द बजावली होती. त्यांच्या अचानक निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर तेजस्वी घोसाळकर यांची नियुक्ती करून बँकेच्या कामकाजात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ठाकरे गटासाठी महत्त्वाचा टप्पा मुंबई जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात ठाकरे गटाशी संबंधित प्रतिनिधींची उपस्थिती कायम राहावी यासाठी ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. तेजस्वी घोसाळकर यांचा अनुभव आणि जनतेशी असलेला संपर्क बँकेच्या कारभारात सकारात्मक बदल घडवेल, अशी अपेक्षा पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केली आहे. सामाजिक सेवा आणि आर्थिक क्षेत्रातील सहभाग सामाजिक कार्यात गुंतलेली व्यक्ती सहकारी बँकेसारख्या संस्थेमध्ये सहभागी झाल्याने नागरिकांच्या गरजांशी जुळणारे निर्णय घेणे सोपे होते, असेही जाणकारांचे मत आहे. तेजस्वी घोसाळकर या नव्या भूमिकेतून आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि महिला सहभागासाठी विशेष कार्य करतील, अशी आशा आहे. ही नियुक्ती केवळ राजकीय नव्हे तर सहकार क्षेत्रातील महिलांच्या सहभागाचे प्रतिक आहे, असे विश्लेषक सांगत आहेत. बँकेच्या आगामी निर्णयप्रक्रियेत तेजस्वी घोसाळकर यांची भुमिका कशी ठरेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिजाऊ ब्रिगेडची विभागीय आढावा बैठक संपन्न

## कमी खर्च करत दोनशे लोकात लग्न लावा, बैठकीत एकमुखाने निर्णय

विशेष प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

छत्रपती संभाजीनगर : येथील जिजाऊ मंदिरात शनिवारी (१४-जून) रोजी झालेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय आढावा बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा झाली यावेळी म हाराष्ट्रात पहिल्यांदाच महिलांचे संघटन असणाऱ्या जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी लग्नाची आचारसंहिता ठरवून त्या संदर्भात शपथ ही घेण्यात आली.बैठकीच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून जिजाऊ वंदनेने बैठकीस सुरुवात करण्यात आली.दोनशे लोकांत लग्न लावा. मुला मुलींच्या लग्नात खर्च-बडेजाव टाळा, लग्नमंडपाचे राजकीय व्यासपीठ बनवू नका, कुंडलीऐवजी मुला-मुलींचे कर्तृत्व पाहा, शिवाजी महाराजांची आरती नको,प्रिवेडींग नको,ज्यांच्या कडे अमाप पैसा आहे त्यांनी आपल्या मुलामुलींच्या लग्नात दुसरे दहा लग्न लावावेत अशी आचारसंहिताच बैठकीत तयार केली आहे. अवास्तव खर्चाला फाटा देत कमी खर्चातङ्कदोनशे लोकांत लग्न लावाफ असा एकमुखी ठराव च पारित करण्यात आला. वैष्णवी हगवणे या मराठा समाजातील




विवाहित तरुणीने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली. तिच्या वडिलांनी शाही थाटात विवाह लावला. सगळी धर्मकार्ये झाली. पण, या सगळ्या गोष्टी तिचा संसार नीट करू शकल्या नाहीत. हुंडा, कुंडली, ज्योतिष, मंगलाष्टके, वऱ्हाडी, अक्षता हे कुणीही तिला वाचवू शकले नाही. पैसे उधळले, धर्मसोपस्कार केले, म्हणजेच लग्न टिकेल ही अंधश्रद्धा आहे, हे लोकांना कळले. असे मत व्यक्त करत उपस्थित प्रतिनिधींनी आपल्या भावना प्रकट केल्या. डी जे वर बंदी घालणे, पारंपरिक वाद्य वाजवणारे लोक कलावंतांना प्रोस्थान देणे,प्री- वेडिंगमधून बिबित्स प्रकार दाखवू नये,नवरा-नवरीला हार घालताना वर उचलून घेऊ नये. कर्ज काढून लग्नात खर्च करु नये. नवरदेवापुढे, वरातीत दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. लग्नात फक्त वधूपिता आणि वरपिता यांनीच फेटे बांधावेत. लग्नात छ. शिवाजी महाराजांची आरती बंद करावी. आणि जिजाऊ वंदना घ्यावी. भेटवस्तूऐवजी पुस्तके, झाडाची रोपे भेट द्यावी. देखावा करू नये, लग्नात हुंडा - घेऊ नये,जेवणात पाचपेक्षा जास्त अन्न पदार्थ ठेवू नये. लग्न साखरपुडा हकद एकाच दिवसी करावा अशी लग्न अचारसहिंता तयार करण्यात आली आहे.

या बैठकीत मराठवाड्यातील जिजाऊ ब्रिगेडच्या सर्व जिल्हाध्यक्षांनी आपला कार्य अहवाल सादर केला.बैठकीत प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका विशद केली तसेच अनेक महत्वपूर्ण बाबींवर चर्चा होवून महत्वाचे ठराव घेण्यात आले.यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सीमाताई बोके, कार्याध्यक्ष विभावरी ताकट, उपाध्यक्ष वर्षा म ने, डॉ. अश्विनी देवके, प्रसिध्दी प्रमूख अँड. वैशाली कडू, रंजना हासुरे, नांदेड जिल्हाध्यक्षा कल्पनाताई चव्हाण सुमित्राताई वडजकर सचिव अर्चनाताई होगे ,राधा कडवकर, ज्योती कोथळकर, लता बावणे यांच्या सह जिजाऊ ब्रिगेडच्या महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# विविध विकासकामे वेळेत पूर्ण करण्यावर भर : पालकमंत्री अतुल सावे

## जिल्ह्यातील स्मशानभुमीसाठी प्रत्येक आमदारांना १ कोटी रुपये निधी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध विकास कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी भर देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनाच्या सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समि तीच्या बैठकीत ते बोलत होते.सुरवातीला ३० जानेवारी २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या अनुपालनास मान्यता देण्यात आली. तसेच गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२४-२५ मध्ये झालेल्या ७४८ कोटी ९९ लाख ९५ हजार रुपये खर्चास मान्यता खर्चास मंजूरी देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना अशा एकत्रित जिल्हा वार्षिक योजनेच्या २०२५-२६ साठी आर्थिक तरतुदीच्या विनियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.सन २०२५-२६ साठी सर्वसाधारणसाठी ५८७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १६४ कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी ६४ कोटी २० लाख २० हजार रुपये याप्रमाणे एकुण ८१५ कोटी २० लाख २० हजार रुपये मंजूर तरतूद आहे. याबाबत आढावा घेण्यात आला. स्मशानभुम ीसाठी प्रत्येक आमदारांना १ कोटी रुपये निधी जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदारसंघातील निधी अभावी प्रलंबित व प्रगतीपथावर असलेल्या कामाबाबत माहिती पालकमंत्री अतुल सावे यांना दिली. यावेळी लोकप्रतिनिधींनी काही गावांमध्ये स्मशानभूम ीबाबत मागणी केली. त्यावर प्रत्येक आमदारांना स्मशानभूमीसाठी १ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना मदतीसाठी पाठपुरावा :- जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या पावसामुळे केळी आणि पपई पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे होऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर



केला आहे. याबाबत शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी या बैठकीत सांगितले. यावेळी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधीनी आपआपल्या मतदार संघातील कामाचा माहिती, प्रश्न, अडचणी पालकमंत्री अतुल सावे यांच्यासमोर मांडल्या. या सर्व सम स्यांची सोडवणूक करण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे पालकमंत्री अतुल सावे यांनी यावेळी यंत्रणाना सांगितले. तसेच जिल्ह्यातील काही भागात ड्रग्जस, अवैध धंदे, अंमली पदार्थाची वाहतुकीच्या तक्रारी आहेत. पोलिसांनी याकडे लक्ष वेधण्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, हरिद्रा संशोधन प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार भिम राव केराम, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर, आमदार राजेश पवार, आमदार जितेश अंतापूरकर, आम दार बाबुराव कोहळीकर, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जून झाडे तसेच जिल्ह्यातील सर्व विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांना २० जुलै पर्यंत अर्ज करण्याची मुदत

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांनी येत्या २० जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत संपूर्ण कागदपत्रासोबत जिल्हा कार्यालयात संपर्क करावा. उशिरा मुदतीनंतर आलेले कागदपत्रे अर्जाचा जिल्हा कार्यालयामार्फत स्विकार करण्यात येणार नाही, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी इत्यादी




अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त टक्केवारी गुण प्राप्त झाले असतील अशा उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना महामंडळाकडून ज्येष्ठता व जास्त गुण क्रमांकानुसार उपलब्ध निधीच्या अधीन राहून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. पुढीलप्रमाणे मुळ कागदपत्रे दोन प्रतीत आणावीत. मार्कशिट, शाळा सोडल्याचा दाखला, रेशनकार्ड, जातीचा दाखला, उत्पनाचा दाखला, आधारकार्ड, दोन फोटो, पुढच्या वर्गात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकीटसह व जिल्हा व्यवस्थाकाच्या नावे शिष्यवृत्ती मागणीचा अर्ज इत्यादी कागदपत्रासह संपर्क साधावा. जिल्हा कार्यालयाचा पत्ता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास म हामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ग्यानमाता शाळेच्या समोर नांदेड दूरध्वनी ०२४६२-२२००८८ मो.नंबर ९३०९१५१०६० हा आहे.

# केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घाणीचे साम्राज्य

## रुग्णालयात औषध गोळ्यांचा तुटवडा औषधा अभावी रुग्णाचे बेहाल

केज । प्रतिनिधी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घाणीचे साम्राज्य माजले असून दुर्गंधी पसरली आहे, सातत्याने उपजिल्हा रुग्णालयात औषध गोळ्यांचा तुटवडा भासत असल्यामुळे औषधा अभावी रुग्णाचे बेहाल होत आहेत असे रुग्ण व रुग्णाच्या नातेवाईकांकडून ऐकण्यास मिळत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या पावसाळा चालू आहे त्यामुळे थंडी-ताप,सर्दी, खोकला, उलटी संडास, गॅस्ट्रो, टायफाईड यासह साथीचे आजार चालू आहेत. केज येथील उपजिल्हा रुग्णालयात केज तालुक्यासह इतरही अनेक ठिकाणाहून रुग्ण उपचार घेण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयात मोठ्या प्रमाणात येतात. परंतु उपजिल्हा रुग्णालयामध्ये सतत पुरेसा औषध गोळ्यांचा साठा उपलब्ध नसतो सतत औषध गोळ्या रुग्णालयामध्ये रुग्णाला मिळत नसल्यामुळे रुग्णाचे व रुग्णाच्या नातेवाईकांचे बेहाल होत असल्याचे चर्चा नातेवाईकांकडून ऐकण्यास मिळत आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक जेवण्यासाठी बसतात त्या ठिकाणी स्वच्छता नसते सतत कचरा पडलेला असतो त्याचबरोबर रुग्णालयाच्या परिसरात रुग्णाकरिता जेवणाची एक कॅन्टींग आहे त्या कॅन्टीनचे घाण पाणी व भांडी धुतलेले, घासलेले सांडपाणी आणि खराब खरकटे अन्न उघड्यावरच टाकण्यात येत आहे त्यामुळे परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य माजले असून त्याची दुर्गंधी पसरली आहे. सदर ठिकाणच्या सांडपाण्यावर व खरकट्या अन्नावर माशा बसत आहेत त्यामुळे परिसरात डासांचे प्रमाण घाणीमुळे वाढले आहे अशा दूषित ठिकाणीच काही रुग्ण व त्यांचे नातेवाईक जेवन करत आहेत त्याचबरोबर उपजिल्हा रुग्णालयातील संडास-बाथरूम देखील अस्वच्छ आहेत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना उपजिल्हा रुग्णालयामध्ये लघुशंकेला शौचाला जाण्याची सोय नाही त्या ठिकाणी बाथरूम हे पूर्णपणे ब्लॉक झालेले असल्यामुळे दुर्गंधी येत आहे. रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना या दूषित वातावरणामुळे रुग्णाचे नातेवाईक देखील आजारी पडण्याची शक्यता नाकरता येत नाही असे नागरिकांतून बोलले जात आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २१ जून २०२५
https://lokaarambh.com



# जगभरात अशांतता वाढली, योगातूनच शांतता मिळेल, योग दिनानिमित्त नरेंद्र मोदी यांचा संदेश

जगभरात अशांतता वाढली आहे. या वेळी योगाची सर्वात जास्त गरज आहे. योगातून शांती मिळतो. योग तणावातून समाधानाकडे घेऊन जातो. योग सर्वांचा आणि सर्वांसाठी आहे. योगाला एक जनआंदोलन बनवू या. हे आंदोलन जगाला शांती, आरोग्य आणि समरसताकडे घेऊन जाईल. या आंदोलनात प्रत्येक व्यक्ती दिवसाची सुरुवात योगाने करेल. या आंदोलनात सर्व समाज योगामुळे एकत्र येईल. योग मानवतेला एका सुत्रात आणेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी म्हटले. योग जीवन शैलीचा भाग पंतप्रधान नरेंद्र मोदी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी त्यांनी योगाचे महत्व सांगितले. जनतेला संबोधित करताना नरेंद्र मोदी म्हणाले, गेल्या दशकातील योगाच्या प्रवासाकडे पाहताना मला अनेक गोष्टी आठवतात. ज्या दिवशी भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून ओळखला जावा, असा प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी



जगभरातील १७३ देशांनी आपणास पाठिंबा दिला. आजच्या जगात असा पाठिंबा मिळणे ही सामान्य गोष्ट नाही. हा केवळ एका प्रस्तावाला पाठिंबा नव्हता, तर तो मानवतेच्या भल्यासाठी जगाचा सामूहिक प्रयत्न होता. आता ११ वर्षांनंतर आपण पाहतो की योग जगभरातील लाखो लोकांच्या जीवनशैलीचा एक भाग बनला आहे. योगाला एक जनआंदोलन बनवू या योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपले दिव्यांग मित्र योगशास्त्राचा अभ्यास करतात हे पाहून मला अभिमान वाटतो. शास्त्रज्ञ अवकाशात योग करतात. सिडनी ऑपेरा हाऊसच्या पायऱ्या असोत, एव्हरेस्टची शिखरे असोत किंवा समुद्राचा विस्तार असो, सर्वत्र एकच संदेश मिळत आहे. देशात लठ्ठपणाचा वाढत आहे. यामुळे लोकांनी जेवणातील तेलाचे प्रमाण १०% कमी करावे. सकस आहाराचे सेवन करावे आणि योगाला एक जनआंदोलन बनवू या, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

## रोहयोतील मस्टर झिरो करू नका; गरीबांचे नुकसान टाळा

### माजी सभापती बळीराम गवतेंनी सदस्यांना सोबत घेवून दिले बीडीओंना निवेदन

बीड पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतील वैयक्तिक आणि सार्वजनिक कामांचे मस्टर झिरो करण्याचे आदेश गटविकास अधिकाऱ्यांनी काढले असून ते आदेश रद्द करून मस्टर झिरो करू नयेत. सदरील आदेशामुळे गोरगरीब लाभार्थ्यांचे नुकसान होणार आहे. सदरील नुकसान टाळावे, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते तथा माजी सभापती बळीराम गवते यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. गटविकास अधिकारी कांबळे यांना दि.१९ रोजी निवेदन देण्यात आले. यावेळी महादेव उबाळे, मोहन देवकते, सचिन शेळके, उत्तरेश्वर सोनवणे, इंदूरे अप्पा यांची उपस्थिती होती. निवेदनात म्हटले आहे, बीड पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतून हजारो कामे सध्या सुरू आहेत. यामध्ये गेल्या २ आठवड्यातील वैयक्तिक व सार्वजनिक कामांची मस्टर झिरो करण्याबाबत गटविकास अधिकारी कांबळे यांनी पत्र काढले आहे. जर हे मस्टर (हजेरी पत्रक) झिरो झाले तर वैयक्तिक लाभाचे घरकुल, गायगोठा, फळबाग, जलसिंचन विहीर, शेततलाव यांसह सार्वजनिकमध्ये पांदण रस्ते, खडीकरण, विविध बांधकामे, सिमेंट रस्ते यांचे अकुशल पेमेंट होणार नाही. त्यामुळे पात्र लाभार्थी यांचे प्रचंड मोठे नुकसान होणार आहे. सदरी नुकसान टाळण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी काढलेले आदेश मागे घेवून मस्टर झिरो करू नयेत, तसे केल्यास लाभार्थ्यांवर अन्याय केल्याची भावना निर्माण होऊ शकते. यामुळे काढलेले आदेश तातडीने रद्द करून मस्टर रद्द करण्याची कारवाई थांबवावी, अशी मागणीही केली आहे. यावेळी बीडीओ कांबळे यांनी मस्टर झिरो करणार नाही, असे आश्वासन दिले.



## संत मुक्ताबाईंच्या पादुकांचे गोदावरीत स्नान

बीड । प्रतिनिधी बुलढाणा जिल्हा येथून संतश्रेष्ठ संत मुक्ताबाई पालखीचे प्रस्थान पंढरपूरच्या दिशेने सुरू झाले असून आज शहागड येथील गोदावरी नदीमध्ये संत मुक्ताबाई पालखीचे पादुकांना वारकऱ्यांनी स्नान घालून गेवराईकडे आगमन केले उद्या बीडमध्ये पालखीचे आगमन होणार आहे. आषाढी एकादशीनिमित्त पांडुरंगाला भेटण्यासाठी राज्यातून राज्याबाहेरून मोठ्या प्रमाणात दिंड्या पंढरपूर मध्ये दाखल होतात गेल्या अनेक वर्षापासून संत मुक्ताबाई पालखीची परंपरा आजही त्याच पद्धतीने सुरू आहे मुक्ताईनगर येथून निघालेल्या या पालखीचे बीड जिल्ह्याच्या हद्दीमध्ये आज आगमन झाले सकाळी शहागड खामगाव नजीक असलेल्या गोदावरी नदीमध्ये संत मुक्ताबाई यांच्या पादुकांना स्नान घालण्यात आली परंपरेनुसार याही वर्षी या ठिकाणी स्नान केले गेले भक्तिभावाने पूजन करण्यात आल्यानंतर दिंडी बीड जिल्ह्याच्या हद्दीमध्ये आली गेवराई नंतर आज बीड जिल्ह्यामध्ये पालखीचे स्वागत होणार आहे बीड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात संत मुक्ताबाई पालखीचे स्वागत केले जाते दोन दिवस मुक्कामानंतर ही पालखी पुन्हा पंढरपूरकडे प्रयाग होते बीड शहरातील बालाजी मंदिर यासोबतच मानवी शेती हनुमान मंदिर या ठिकाणी मुक्कामानंतर पुन्हा पालखी पंढरपूरच्या दिशेने निघते.

## बीड सोडले तरी बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही-डॉ.पूनम भालेराव

बीड । प्रतिनिधी शहराच्या सुकन्या डॉ. पूनम भालेराव यांना कौटुंबिक कारणामुळे बीड येथील दवाखाना बंद करून पुणे येथे स्थायिक व्हावे लागले. यामुळे बीडकर एका चांगल्या त्वचा सौंदर्य तज्ञाच्या सेवेपासून वंचित राहणार की काय अशी शंका उपस्थित होत होती परंतु या शंकेला आता पूर्णविराम देत दस्तूरखुद्द डॉ. पूनम भालेराव यांनी म्हटले आहे की, बीड सोडले तरी बीडकरांशी नाळ तुटू देणार नाही. प्रत्येक महिन्याच्या एक रविवारी रुग्ण तपासणीसाठी हमखास बीडला भेट देऊन रुग्ण तपासणी करणार आहे. यामुळे महिन्यातून एक दिवस का होईना त्वचा सौंदर्य तज्ञ असलेल्या डॉ. पुनम भालेराव यांची सेवा बीडच्या रुग्णांना मिळणार आहे. डॉ. पूनम भालेराव या येत्या रविवार दिनांक २२ जून रोजी सकाळी ११:०० ते संध्याकाळी ०४:०० पर्यंत रुग्णांचे पिंपल्स (मरूम), वांग, चेहऱ्यावरील सुरकुत्या, डोळ्याखालील काळे डाग, कोरडी त्वचा, नखांचे आजार, गजकर्ण, पांढरे डाग (कोड), सोरियासिस, स्ट्रेच मार्क (व्रण), त्वचेचे सर्व आजार, सनटेन ट्रीटमेंट, स्कीन टायटनिंग, केस गळती, केसातील कोंडा, केसांची वाढ खु टणे, हायड्रोफेशियल, मायक्रो नीडलिंग, पी.आर.पी. (केसांसाठी व त्वचेसाठी), शरीरावरील अनावश्यक केसांसाठी उपचार, टॅटू-गोंदण, केमिकल पिलिंग, मस-चामखीळ इत्यादींची

## मयत ठेवीदार जाधव यांच्या कुटुंबियांचे प्रा.उबाळे यांनी केले सांत्वन

ज्ञानराधा व छत्रपती मल्टिस्ट`टमध्ये अडकलेल्या ठेवीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतून खळेगाव येथील ठेवीदार शेतकरी सुरेश जाधव यांनी काल आत्महत्या केली. या घटनेची माहिती कळाल्यानंतर स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे यांनी जाधव कुटुंबियांची गुरुवारी (दि.१९) भेट घेऊन सांत्वन केले. ठेवीदारांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही असे प्रा.उबाळे म्हणाले. जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमुळे गोरगरीब व सर्वसामान्य ठेवीदार मोठ्या आर्थिक अडचणींना तोंड देत आहेत. यातच बुधवारी गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील शेतकरी सुरेश जाधव यांनी छत्रपती मल्टिस्टेटच्या गेवराई शाखेसमोर गळाफास घेऊन आत्महत्या केली. दरम्यान स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे यांनी खळेगाव येथे जाधव कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. शेतकरी सुरेश जाधव यांच्यावर आई, पत्नी, दोन मुले यांची जबाबदारी होती. मात्र त्यांच्या निधनाने सर्व कुटुंबिय उघड्यावर पडले आहे. यावेळी प्रा.उबाळे यांनी कुटुंबियांची भेट घेऊन चर्चा केली. सुरेश जाधव हे गेवराईमध्ये मोटार रिवायडिंगचे काम करत होते तर त्यांच्या पत्नी टेलरिंग व्यवसाय करतात. वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून जाधव यांच्यावर सर्व जबाबदारी होती. यातच मुलीने नीट परीक्षेमध्ये २२६ गुण मिळवून नावलौकीक केले तर मुलगा बारावीला असून त्याला पुढील शिक्षणासाठी क्लासेसची गरज होती. एकुणच मुलांच्या शिक्षणासाठी सुरेश जाधव यांनी ज्ञानराधामध्ये ४ लाख तर छत्रपती मल्टिस्टेटमध्ये ९ लाख रुपयांच्या ठेवी ठेवल्या होत्या. मात्र दोन्ही मल्टिस्टेट दिवाळखोरीत निघाल्याने आता मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवायचा याचा विचार करुन त्रस्त झालेल्या सुरेश जाधव यांनी बुधवारी छत्रपती मल्टिस्टेटच्या गेवराई शाखेसमोर गळाफास घेऊन जीवनयात्रा संपविली असे जाधव कुटुंबियांनी प्रा.उबाळे यांना सांगितले. दरम्यान, ठेवीदारांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही. प्रत्येक ठेवीदाराचा एक ना एक पैसा मिळेपर्यंत लढणार असून काहीही झाले तरी ठेवीदारांनी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलू नये असे आवाहन प्रा.उबाळे यांनी यावेळी केल

# लाडेवडगाव शिवारात वृद्ध महिलेचा कान तोडून ७३ हजाराचे दागिने पळविले



केज । प्रतिनिधी तालुक्यातील लाड`वडगाव शिवारातील पत्र्याच्या शेडमध्ये राहणाऱ्या एका वयोवृद्ध दांपत्याला मारहाण करुन ७३ हजार रुपयांचे दागिने तोंडावर कपडा बांधून आलेल्या चौघांनी जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली. असून वृद्ध महिलेच्या कानातील कर्णफूल निघत नाही आसे लक्षात येताच चक्क कान तोडून, महिलेला जखमी करुन ते चोरट्यानी पळविल्या प्रकरणी समाबाई तुकाराम लाड वय ८० वर्षे रा लाडेवाडगाव यां महिलेच्या फिर्यादीवरून ४ अज्ञात चोरट्याविरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. समाबाई व त्यांचे पती तुकाराम लाड हे दोन दिवसापूर्वीच आडस रस्त्यालगत आसलेल्या लवणं नावाच्या शेतात राहायला गेले होते. मंगळवारी ( दि. १७ ) जेवण करुन ते आपल्या पत्र्याच्या शेडमध्ये झोपले आसता मध्यरात्री १ ते २ वाजण्याच्या दरम्यान तुकाराम लाड यांना चोरटे मराठी भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करीत असल्याचे समाबाई लाड यांच्या लक्षात येताच त्यांना जाग आली आसता चोरट्याने त्यांच्या जवळचा मोबाईल हिसकावून घेतला, त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र, नाकातील नथ आणि कानातील कर्णफुले , असा एकूण ७३ हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावून घेतला. त्यानंतर चारही चोरटे लोखंडी गेटवरून उड्या मारून अंबाजोगाईच्या दिशेने पायी निघून गेले. चारही चोरट्याच्या चेहऱ्यावर कपडे बांधलेले असल्याने त्यांची ओळख पटली नाही, त्यापैकी दोघे सडपातळ तर दोघे मध्यम शरीरयष्टीचे होते, अशी माहिती समाबाई लाड यांनी पोलिसांना दिली. समाबाई लाड यांच्या एका कानातील फुल निघत नसल्याने चोरट्याने कानाला हिसका देऊन ते लुबाडून घेतले त्यामुळे त्यांच्या कानाला जखम त्या जखमी झाल्या आहेत. लाडेवडगाव येथील ऐवज लंपास करुन तेथून ३ किमी अंतरावरील एक ढाब्यावर ही चोरट्यानी डल्ला मारला आहे. त्या ठिकाणी चोरटे सिसी टीव्हीत कैद झाल्याची माहिती तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांनी बोलताना दिली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com